प्रेस नोट

" महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल कार्यशाळा "

जा.क्र. ७०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/१०/२०१७

भंडारा:— भंडारा जिल्हयात महाराष्ट्र पोलीस दलातर्फे नागरीकांना ऑनलाईन/सुवीधा व्हावी. याकरीता महाराष्ट्र पोलीस सिटीझन पोर्टल तयार केले आहे.

www.mhpolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरीकांना तक्रार नोंदविता येईल. अटक आरोपीची माहिती, हरविलेले व्यक्तीची माहिती, अनोळखी मृतदेहाची माहिती, फरारी व्यक्तीची माहिती शोधता व पहाता येईल, महाराष्ट्र घटक स्थळांच्या लिंक, ॲप्लीकेशन फार्म डाऊनलोड तसेच हरविलेल्या मोबाईल बाबत सुचना देता येईल. सदर सिटीझन पोर्टलवर तक्रार कशी दाखल करावी. त्यानंतर दाखल झालेल्या तक्रारीचा निपटारा सिसीटीएनएस प्रणाली व्दारे कसा करावा. तसेच सदर पोर्टलच्या इतर टॅब बाबत पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा जोगदंड, उपविभागीय पोलीस अधिकारी साकोली डिसले, उपविभागीय पोलीस अधिकारी तुमसर साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी पवनी टिक्कस पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना प्रत्यक्षीकासह व्यापक माहिती मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/१०/२०१७ रोजी गुन्हे अन्वेषण विभाग भंडारा येथे माहिती देण्यात आली.

दैनंदिन दाखल होणारे गुन्हे सीसीटीएनएस कार्यप्रणाली मार्फत (महाराष्ट्र पोलीस सिटीजन पोर्टल)www.mhpolice.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे सीसीटीएनएस कार्यप्रणाली मार्फत प्रदर्शित करण्याबाबत प्रशिक्षीत करण्यात आले.

जनतेनी पोलीस विभागातर्फे उपलब्ध केलेल्या सुविधांचा जास्तीत जास्त वापर करून पोलीसांना सहकार्य करावे.

(एस. व्ही. कुलकर्णी)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.